दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

मुख्य संपादक : अजय भांगे

## लाडक्या बहिणींच्या अर्जांची छाननी ही केवळ अफवा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–लाडकी बहिण योजनेच्या अर्जाची छाननी करण्याचा कोणताही निर्णय झालेला नसल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदार आदिती तटकरे यांनी म्हटले आहे. मी या खात्याची मंत्री असेपर्यंत असा कोणताही निर्णय झाला नसल्याचे त्या म्हणाल्या. तशा काही तक्रारी आल्या तर सरकार पुढील निर्णय घेईल. पण अद्याप तशा तक्रारी दाखल झालेल्या नसल्याचा दावा देखील तटकरे यांनी केला आहे.लाडकी बहीण योजनेच्या अर्जाची छाननी करून त्यातील महिलांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप विरोधकांच्याकडून केला जात आहे. मात्र यावर आदिती तटकरे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. लाडकी बहिण योजनेचा जीआर काढला त्यावेळी त्यात काही नियम दिले गेले होते. त्या नियमानुसारच सर्व महिलांना योजनेचा लाभ देण्यात आला असल्याचा दावा आदिती तटकरे यांनी केला आहे. सर्व निकषांमध्ये बसणाऱ्या महिलांनाच लाडकी बहिण योजनेचे पैसे देण्यात आले असल्याचा दावा देखील त्यांनी केला.लाडक्या बहिणी संदर्भात नियम बदलले जाणार असल्याच्या अफवा पसरवल्या जात असल्याचे देखील तटकरे यांनी म्हटले आहे.

● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार दि.१० डिसेंबर २०२४ ● आरएनआय–एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक–१०३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# राज्यात बनावट औषध पुरवठ्याचा सुळसुळाट

**अंबाजोगाई (परवेज पटेल)–येथील शासकीय रुग्णालयास पुरवलेल्या औषधांचा साठा बनावट असल्याचे स्पष्ट होताच विशाल एंटरप्राइजेस कंपनीसह सुरत, ठाणे आणि भिवंडी येथील औषध पुरवठादारावर नागपूरच्या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालाय. नागपुर, वर्धा, भिवंडी आणि आता अंबाजोगाईसह राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये बनावट औषध पुरवठ्याच्या घटना उघडकीस येत असून औषध पुरवठ्यात होणाऱ्या बोगसगिरीची भांडाफोड झाली आहे. या प्रकरणात मोठे आंतरराज्यीय केटि असण्याची शक्यता असून शासकीय रुग्णालयांमध्येच बोगस औषधांचा साठा सापडल्यानं खळबळ उडाली आहे. मागच्या पंधरा महिन्यापासून या प्रकरणाचा तपास सुरू आहे मात्र अद्याप प्रशासनाच्या हाती काहीच कसे लागले नाही असा प्रश्न उपस्थित केला जातोय?**



अंबाजोगाई प्रमाणेच नागपूर येथील शासकीय रुग्णालयास पुरवलेल्या औषधांचा साठा बनावट असल्याचे स्पष्ट होताच कोल्हापूर मधल्या विशाल एंटरप्राइजेस कंपनीसह सुरत ठाणे आणि भिवंडी येथील औषध पुरवठादार आणि बितराकावर नागपूरच्या अजनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. विशेष म्हणजे बामध्ये प्रमुख आरोपी असलेल्या विशाल एंटरप्राइजेस ने मात्र गोळ्याच्या उत्पादन करणाऱ्या कंपनीनीच दोषी असल्याचे तपासात महटले आहे. नेमकं प्रकरण काय?

नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाला ६ लाख ९२ हजार बनावट औषधांचा पुरवठा झाल्याची धक्कादायक माहिति समोर आली होती. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडयात पुरवठादार कंपनीची विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला. रिकर्तव्ह ६२५ ही अंटीबायोटीक औषधं रुग्णालयाला पुरवली आणि रुग्णालयाने ही औषध रुग्णांना वाटप सुद्धा केली. याप्रकरणी अजनी पोलिसांनी चार कंपन्यांच्या संचालकांविरोधात गुन्हा दाखल केला दरम्यान, २१ ऑगस्ट २०२३ ला अन्न व औषध प्रशासनानं २९ ऑगस्ट २०२३ त्ता शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या औषध भांडारातून औषधांचे काही नमुने तपासणीसाठी गोळा केले होते. हे नमुने मुंबईतल्या प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले त्या औषधांचा अहवाल ३१ जुलै २०२४ ला अन्न व औषध प्रशासनाच्या प्रादेशिक कार्यालयाला प्राप्त झाला असून हे औषधं बनावट असल्याचं समोर आलं होते. त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाचे निरीक्षक नितीन भांडारकर यांनी अजनी पोलिसांत २ ऑक्टोबरला तक्रार दिली होती त्यानंतर चार कंपन्यांच्या संचालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे यामध्ये कोल्हापुरातील विशाल एन्टरप्रायजेसचे सुरेश पाटील सुरतची फार्मासिक्स बायटच्या प्रीती त्रिवेदी, भिवंडीतील अक्हाटीक बायोटेक प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक मिहिर त्रिवेदी आणि मीरा रोडवरील काबिज जेनरिकचे संचालक विजय शैलेंद्र चौधरी या आरोपींचा समावेश असून बापैकी विजय चौधरी आणि मिहिर त्रिवेदी आधीच मार्च २०२३ मध्ये नागपूर जिल्ह्यात कळमेश्वर येथे दाखल झालेल्या अशाच प्रकरणात तुरुंगात आहे वर्धा जिलद्वात ४ ऑगस्टला असाथ प्रकार पुढे आला होता. यांत अंजिमसिन नावाचे बनावट १ लाख ८० हजार टैब्लेट जाम करण्यात आले होते वर्षा अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई होती. प्रकरण उघडकीस वेण्याच्या आठ ते दहा महिन्यापासून रुग्णांना बनावट टॅब्लेट दिली जात होती जिल्हा सामान्य रुग्णालय यांनी एप्रिल महिन्यात ६ लाख ३० हजार टॅबलेट खरेदी केली होती. अशाच प्रकारे भिवंडी आणि सुरत येथील मरिस्टों फॉम्र्म्युलेशन कंपनीचा बनावट अजिमसिन टॅब्लेटचा पुरवठा केला होता त्या प्रकरणात वर्ध्याच्या १० लाखांचा मुद्देमाल आऊ कडून जात केला होता

### जुन्या भांडणाची कुरापत

## केज तालुक्यातील मस्साजोग येथे सरपंचाची अपहरण करुन हत्या

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील एका सरपंचाची अपहरण करुन हत्या करण्यात आलीये.केज तालुक्यातील मस्साजोग येथे सरपंचाचे अपहरण करून खून करण्यात आल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. मस्साजोग येथील सरपंचाचे अपहरण करून खून अपहरण करुन हत्या करण्यात आलीये. संतोष देशमुख असं सरपंचाचे नाव असून त्यांचा मृतदेह केज परिसरात आढळून आला आहे.

अधिकची माहिती अशी की, सरपंच आणि त्यांचा भाऊ धारूर हून केजच्या दिशेने जात असताना अनोळखी इसमांनी गाडी आडवी लावून सरपंचांना मारहाण केली. त्यानंतर त्यांचे अपहरण करण्यात आले. दरम्यान या घटनेनंतर सरपंच संतोष देशमुख यांचा मृतदेह आढळून आला. जुन्या भांडणाची कुरापत काढून हा खून झाल्याचा आरोप मृत सरपंच संतोष देशमुख यांच्या भावाने केला आहे. सरपंचाचे भाऊ शिवराज देशमुख यांच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाण्यात सहा जणांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आलाय. देशमुख यांचा मृतदेह केज उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आला असून मोठा जमाव या ठिकाणी जमला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, संतोष देशमुख व त्यांचा वाहन चालक हे चारचाकी गाडीतून मस्साजोग कडे जात असताना डोणगाव जवळ दोन वाहणातून येऊन अज्ञात व्यक्तींनी गाडी अडवून गाडीची तोडफोड करून संतोष देशमुख यांचे अपहरण केले असल्याची तक्रार केज पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती मात्र काही तासानंतर बोरगाव – दहीटना रस्त्यावर संतोष देशमुख यांचा मृतदेह आढळून आला असल्याने एकच खळबळ उडाली आहे. संतोष देशमुख हे त्यांच्या अनेक चांगल्या कार्यामुळे तालुक्यात परिचित होते त्यांनी मस्साजोग ग्रामपंचायत ला अनेक पुरस्कार मिळवून दिले आहेत.या घटनेमुळे तालुक्यात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. नेमका हा घातपाताचा प्रकार कसा व का घडला याचा तपास केज पोलीस करत आहेत.



## पेरणी या कविता संग्रहाला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून नवलेखक अनुदान प्राप्त



**कन्नड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राभरात आपली कवी म्हणून छाप पाडणारे वेगवेगळ्या दैनिकातून,दिवाळी अंकातून, साप्ताहिकातून, सोशल मेडीयातून नेहमी साहित्यात चर्चेत असलेला कवी शेती माती , सामाजिक जीवनाची जडणघडण ,लिहिणारा आणि जगणारा कवी गल्लीपासून थेट दिल्लीपर्यंत आपल्या नावाची थाप पाडणारा नामवंत कवी श्री.ज्ञानेश्वर गायके जनसामान्यांनी मान्य केलेली लेखणी आता साहित्य मंडळानेही मान्य केली. खऱ्या अर्थाने राजकवी होण्याचा शिक्का मोहर्तब झाला. त्यांच्या लेखणीला पेरणी या कवितासंग्रहाला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने नवलेखक अनुदान देऊन 'पेरणी' काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा निर्णय दिला. अनघा प्रकाशन ठाणे येथून ते प्रिंट होऊन वाचकांना वाचायला मिळेल..आपल्या माणसाच्या सन्मानाचे कौतुक करतांना कवी – प्रवीण दाभाडे सर व समस्त साईबाबा कॉलनी मित्र परिवारांनी पुढील वाटचालीसाठी शाल व पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

### अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील

## बनावट औषध प्रकरणी तपास सीबीआय मार्फत व्हावा–डॉ.इंगोले

**अंबेजोगाई । प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील रुग्णांना देण्यात आलेली औषधी बनावट असल्याचे तपासणी अहवालात सिद्ध झाले आहे. याप्रकरणी अन्न औषध निरीक्षक यांच्या फिर्यादीवरून चार औषध कंपन्यांवर गुन्हेही दाखल झाले आहेत. याप्रकरणी सीबीआय चौकशीची मागणी अंबेजोगाईचे माजी शिक्षण सभापती डॉ. राजेश इंगोले यांनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपविभागीय आधिकारी कार्यालयामार्फत केली आहे.

या घटने बाबत बोलताना डॉ इंगोले यांनी हे प्रकरण वरकरणी वाटते तेवढे सोपे नाही. या कंपन्यांनी महाराष्ट्रातील इतर वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या ठिकाणीही याच प्रकारची बनावट औषधी वितरित केली असल्याची शक्यता आहे. याप्रकरणी वैद्यकीय संचालक कार्यालयातील वरिष्ठ



अधिकारी व कर्मचारी यांचाही सहभाग असल्याची शक्यता नाकारता येत नाही कारण ही औषधी वितरित करण्याची शासकीय मान्यता ही याच संचालक कार्यालयाकडूनच दिली जाते. या लोकांची बनावट औषधी देण्याची हिम्मत होतेच कशी हा सवाल करत सदरील गंभीर प्रकार हा महाराष्ट्रातील सर्व शासकीय रुग्णालयात घडल्या असण्याची शक्यता आहे. हा प्रकार म्हणजे सर्वसामान्य रुग्णांच्या जीविताशी खेळ करण्याचा गंभीर प्रकार आहे. तरी या प्रकरणाची पाळेमुळे उकरून याचा निष्पक्षपाती तपास होणे गरजेचे आहे. तसेच या आरोपींविरुद्ध या कंपन्यांविरुद्ध कायदेशीर कार्यवाही होणे गरजेचे आहे. जेणेकरून भविष्यामध्ये इतर कंपन्या असा प्रकार करण्याचे धाडस करणार नाही यासाठी हे प्रकरण सीबीआय कडे देऊन सर्वसामान्य जनतेला न्याय मिळावा ही अपेक्षा सर्वसामान्य जनतेची आहे. या प्रकरणात कुणालाही पाठीशी घालण्यात येवु नये त्यासाठी या घटनेचा पाठपुरावा आपण शेवटपर्यंत करणार असल्याची माहितीही डॉ राजेश इंगोले यांनी दिली आहे.

## शिवसेना पनवेल तालुका उपाध्यक्ष प्रवीण ठाकूर यांच्या हस्ते महिलांना साडी वाटप

**उरण । विठ्ठल ममताबादे**

महायुतीचे सरकार महिलांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्रयत्नशील असून महिलांच्या उन्नतीसाठी शासन विविध योजना, उपक्रमांच्या माध्यमातून महिलांच्या विकासासाठी हातभार लावत आहे. म्हणून महिलांनी आता विकासासाठी एकत्र येण्याची गरज आहे. महायुतीने महिलांसाठी लाडकी बहीण योजना मोठया प्रमाणात राबविली. त्याला महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे.ज्या ज्या महिलांनी लाडकी बहीण योजनेसाठी नोंदविले नसतील त्यांनी आपले नाव त्वरित नोंदवावेत व या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेना शिंदे गटाचे पनवेल तालुका उपाध्यक्ष प्रवीण राम ठाकूर यांनी उलवे येथे केले.

शिवसेना शिंदे गटाच्या माध्यमातून श्री साई मंदिर, सेक्टर ९, उलवे नोड येथे महिलांना साडी वाटप करण्यात आले. तसेच महिलांच्या विविध योजना, उपक्रम या



विषयी जनजागृती करण्यात आली. विविध विषयावर प्रबोधन करण्यात आले. यावेळी महिला शहर प्रमुख सोनल घरत, उलवे शहर प्रमुख संदीप वायंगणकर, जीवन परसे (कळंबोली )तसेच इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी आगामी होणाऱ्या निवडणुकीत नगर परिषद, महानगर पालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत निवडणुकीत महिला भगिनींनी महायुतीला मोठया प्रमाणात मतदान करावे. महायुतीचे प्रतिनिधी मोठया प्रमाणात निवडून द्यावेत असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## घुंगराळा येथे पशु प्रदर्शन व कृषी प्रदर्शन पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या उद्घाटन संपन्न

**नायगाव । हानुमंत चंदनकर**

नायगाव तालुक्यातील मौजे घुंगराळा येथे समस्त गावकऱ्यांच्या वतीने जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये पशु प्रदर्शन व कृषी प्रदर्शन त्याच बरोबर आकर्षक घोड्याचे ही प्रदर्शन भरण्यात आली होते या सदरच्या विशेष कार्यक्रमाला नांदेड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी उपस्थित होते त्यावेळी पत्रकारांनी सदरच्या कार्यक्रमात विशेष सत्कार केला आहे तालुक्यातील श्रीक्षेत्र माळसाकांत यात्रे दरम्यान कृषी व पशु प्रदर्शन मेळावा आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी शिक्षण सभापती शिवराज पाटील होटाळकर नांदेड जिल्हाचे पोलीस अबिनाश कुमार यांच्यासह राजेश कुंटूरकर साहेब चेअरमन शुगर कारखाना कुंटूर बालाजी बच्चेवार माजी जिल्हा परिषद सदस्य बरबडा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस वसंत पाटील सुगावे आदी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.नायागांव तालुका अध्यक्ष रवींद्र पाटील भिलवंडे शिवसेना अध्यक्ष सूर्याजी चाडकर माजी जिल्हा परिषद सदस्य कुंटूर डॉ शिवाजीराव कागडे नितीन हिवरे अनिल जोंधळे जी एस खिल्लारे राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गट विश्वनाथ बडूरे एस पी उदगिरे पाटील निरीक्षण देवरे यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक रामकृष्ण श्रीहरी पाटील कुंटूर आदी मान्यवर व तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक या कार्यक्रमाला उपस्थित होते

नायगांव तालुक्यातील घुंगराळा येथील आयोजित केलेल्या कार्यक्रमात यावेळी पत्रकाराच्या वतीने जिल्हाचे पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांचा पत्रकाराच्या वतीने सत्कार रामप्रसाद चन्नावार. माधव पवार. हणमंत चंदनकर. शिवाजी पांचाळ. यांनी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांचा सत्कार केला आहे.



संपादकीय

# संशयक-ल्लोळात 'सेबी'!

'हिंडेनबर्ग' या अमेरिकी गुंतवणूकदार कंपनीने आपल्या नव्या आरोपात थेट 'सेबी'प्रमुख माधबी पुरी-बुच यांनाच लक्ष्य केल्याने पुन्हा एकदा भारतीय बाजारात नव्याने खळबळ उडणे साहजिक. भांडवली बाजाराची नियंत्रक असलेल्या 'सिक्युरिटीज अ‍ॅण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया' म्हणजे 'सेबी' आणि तिच्या प्रमुखांविषयीचे 'हिंडेनबर्ग'चे हे आरोप संबंधित यंत्रणांस परेशान तर करतीलच; पण गुंतवणूकदारांच्या मनांत गोंधळ वाढवतील. ते ज्या कंपनीशी संबंधित आहेत त्या कंपनीच्या समभागांचे सोमवारी जे काही झाले त्यावरून हा गोंधळ किती गंभीर असू शकतो हे कळेल. याआधी साधारण दीड वर्षापूर्वी या हिंडेनबर्गाने सध्या पंचमहाभूतांस कवेत घेणाऱ्या अदानी समूहावर आरोप केले. त्याचा व्हायचा तो परिणाम झाला आणि प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन चौकशी समित्याही नेमाव्या लागल्या. चौकशी करणाऱ्या 'सेबी'ने हिंडेनबर्गास नोटीस पाठवली आणि तीस उत्तर देताना या गुंतवणूक-गृहाने 'सेबी'च्या चौकशीलाच वाकुल्या दाखवल्या. येथपर्यंत ठीक. पण या वेळी हिंडेनबर्ग आणखी एक पाऊल पुढे गेले असून अदानी-संबंधित परदेशी वित्तसंस्थांत 'सेबी'प्रमुख आणि त्यांच्या पतीचे गुंतवणूक हितसंबंध असल्याचा आरोप करण्यापर्यंत या कंपनीची मजल गेली. तसेच या हितसंबंधांमुळे अदानीसंदर्भातील चौकशी प्रामाणिकपणे होत नसल्याचे हा नवा आरोप सूचित करतो. हे आणखी धोकादायक. त्यामुळे बुच दम्पतीने तातडीने या संदर्भात खुलासा केला आणि आरोप बिनबुडाचे असल्याचा दावा केला. या इतक्या गंभीर आरोपांमुळे राजकीय राळ उडली नसती तरच नवल. विरोधकांनी यावर संयुक्त संसदीय समितीमार्फत चौकशीची मागणी केली. यावर नागरिकही आपापले राजकीय राग-लोभ सांभाळत जमेल तशा भूमिका घेताना दिसतात. तथापि त्या सगळ्याच्या पलीकडे जात त्यावर भाष्य व्हायला हवे.

ते करताना आवर्जून लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे माधबी बुच यांची पार्श्वभूमी. खासगी क्षेत्रातून 'सेबी' या भांडवली बाजाराच्या सरकारी नियंत्रकपदी नेमणूक झालेली ही पहिली व्यक्ती. 'सेबी'चे आतापर्यंतचे सर्व प्रमुख हे सरकारी सेवेतून निवडले गेलेले होते. माधबीबाईंचा मात्र अपवाद. त्या जवळपास दोन दशके 'आयसीआयसीआय' या खासगी बँकेत होत्या आणि नंतर मध्येच नोकरी सोडून पतीसमवेत त्यांनी सिंगापूर येथे एक गुंतवणूक कंपनी (फंड) स्थापन केली. या काळात त्या सिंगापूरवासी होत्या. 'सेबी'च्या प्रमुखपदी निवड झाल्यानंतर जवळपास दोन आठवड्यांनी या गुंतवणूक कंपनीतील आपला सर्व वाटा त्यांनी पतीस विकला आणि त्याची सर्व माहिती सिंगापूर सरकारसह भारतीय यंत्रणांनाही त्यांच्याकडून दिली गेली. 'हिंडेनबर्ग' आरोप करतो तो नेमक्या याच गुंतवणूक कंपनीवर. या कंपनीने म्हणजे पर्यायाने बुच दाम्पत्याने अदानींशी संबंधित अनेक वा काही परदेशी कंपन्यांत गुंतवणूक केली आणि ती दडवून ठेवली असे हिंडेनबर्गचे म्हणणे. अदानी समूहात या दोघांचे हितसंबंध असल्याने त्या कंपनीच्या व्यवहारांची चौकशी 'सेबी' प्रामाणिकपणे करू शकली नाही, असे हिंडेनबर्गचा नवा अहवाल सुचवतो. गंमत म्हणजे हा आरोप हिंडेनबर्गने कोणा स्वतंत्र संशोधनाच्या आधारे केलेला आहे असे नाही. तर जी माहिती संबंधित यंत्रणांना आधीच दिली गेलेली आहे, ती त्यांच्या वेबसाइट्सवरून वा अन्य मार्गाने गोळा करून हिंडेनबर्ग त्यातील टिंबे जोडतो आणि बुच दाम्पत्यास घायाळ करतो.या दोघांचे हे घायाळ होणे अपरिहार्य आहे. याचे कारण 'काळ्या' आणि 'पांढऱ्या'च्या बेचक्यात अडकलेले काही प्रश्न. उदाहरणार्थ 'सेबी'सारख्या यंत्रणेचे नेतृत्व करणाऱ्यांना आवश्यक ते 'डिसक्लोजर'- अर्थात प्रकटन-रास्त वेळी द्यावे लागते. म्हणजे आपण, आपल्या कुटुंबीयांनी, मुला-बाळांनी कोठे गुंतवणूक केलेली आहे, कोठे त्यांचे आर्थिक संबंध आहेत इत्यादींची माहिती जाहीर करणे. त्यामुळे संशयास वाव राहात नाही. तशी ती सर्व माहिती माधबीबाईंनी जाहीर केली होती का? या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी असेल तर रविवारी उशिरा रात्री त्यांना ''पण आमची काहींतील गुंतवणूक मी 'सेबी'प्रमुख होण्याच्या आधीची आहे'', अशा छापाचा खुलासा का करावा लागला? तसेच 'सेबी'च्या प्रमुख या नात्याने अदानी प्रकरणाच्या चौकशीचा निर्णय घेताना ज्या ज्या परदेशस्थ कंपन्यांचा उल्लेख झाला त्या वेळी त्या कंपन्या आणि बुच कुटुंबीय यांतील संबंध त्यांनी उघड केले का? किंवा या कंपन्यांबाबत निर्णय घेताना त्यांनी त्या निर्णयप्रक्रियेपासून स्वत:स दूर (रिक्यूज) ठेवले का? न्यायाधीश स्वत:शी दूरान्वयानेही संबंधित प्रकरण सुनावणीस आल्यास त्या खटल्यापासून स्वत:स दूर करण्याची विनंती वरिष्ठांस करतात. तसे काही माधबीबाईंनी केले होते किंवा काय? हे गुंतवणूकदारांस समजणे आवश्यक आहे. व्यवस्थेच्या पारदर्शकतेविषयी संशय दूर होणे गरजेचे आहे कारण अशा पारदर्शक बाजारपेठा गुंतवणुकीसाठी सर्वार्थाने आकर्षक ठरतात. पारदर्शकतेत सुरक्षेची हमी असते. भारतीय भांडवली बाजार असा सुरक्षित आणि आकर्षक राहील याची जबाबदारी 'सेबी'ची. म्हणून 'सेबी'प्रमुख माधबीबाईंचे वर्तन महत्त्वाचे. ते पारदर्शी आहे असे केवळ म्हणणे पुरेसे नाही. तर ते खरोखरच पारदर्शी आहे असे दिसावे लागते. 'हिंडेनबर्ग'चे आरोप हे दिसणे धूसर करते. म्हणून त्याची दखल घ्यावी लागते.

आणि ती सत्ताधारीही घेतात. पण ती घेताना यामागे 'परदेशी शक्ती' असल्याचा आरोप ते करतात. यावर हसावे की रडावे, हा प्रश्न. ''आपल्या वाईटासाठी जगात अनेक देश दबा धरून आहेत'', ही विचारधाराच मुळात स्वत:कडे अकारण मोठेपणा घेणारी. भारतीय यंत्रणांनी माती खाल्ली असेल आणि हा मुद्दा येथील विरोधकांनी उचलला असेल तर त्यात परदेशी हाताचा संबंध येतो कोठे? सत्ताधाऱ्यांवर केलेल्या प्रत्येक आरोपामागे परकीय शक्तींचा हात असतो हे कथानक इंदिरा गांधी यांच्या काळात लोकप्रिय होते. त्या गेल्या त्यास चार दशके लोटली. हा परदेशी हात काही कोणी शोधून काढलेला नाही. आणि दुसरे असे की विरोधकांनी सत्ताधाऱ्यांस अडचणीत आणणाऱ्या मुद्द्यांमागे परकीय शक्तींचा हात असतो/ आहे हे खरे मानायचे तर मनमोहन सिंग पंतप्रधान असताना झालेल्या डझनभर आरोपांचे काय? त्या वेळी तर दूरसंचार ते कोळसा अशा अनेक क्षेत्रांत गैरव्यवहारांचे आरोप झाले आणि नंतर ते सर्वच्या सर्व बिनबुडाचे असल्याचे न्यायालयांत सिद्ध झाले. त्या आरोपांचे राजकारण करत सत्तेवर आलेल्यांनाही ते आरोप सिद्ध करता आले नाहीत. तेव्हा त्या आरोपांमागे 'परकीय शक्तीं'चा हात होता असे मानायचे काय? तेव्हाचे आरोप तेव्हाच्या विरोधकांनी सदसद्विवेकबुद्धीस स्मरून केलेले आणि आताच्या विरोधकांचे आरोप मात्र परकीय शक्तींनी प्रेरित, हे कसे?तेव्हा बुच-दाम्पत्याने कायदेभंग केला किंवा काय, याबाबत संदिग्धता जरूर असेल. त्यांनी सर्व कायदेकानू पाळले असतीलही. पण अशा पदांवरील व्यक्तींचे वर्तन केवळ कायदेशीर असणे पुरेसे नसते. ते औचित्यास धरूनही असावे लागते. त्यासाठी 'सेबी'प्रमुखांच्या व्यवहारांची अन्य यंत्रणेमार्फत चौकशी होण्यात हरकत काय? कर नसेल तर त्यास डर असायचेही कारण नाही. तेव्हा विरोधकांस अदानी मुद्द्यावर निष्प्रभ करावयाचे असेल तर त्यांनी यावर दबाव वाढवायच्या आत सरकारने चौकशी जाहीर करणे राजकीयदृष्ट्यादेखील शहाणपणाचे ठरेल. असा राजकीय शहाणपणा सरकारने दाखवावा. 'सेबी'सारख्या महत्त्वाच्या यंत्रणाप्रमुखास संशयकल्लोळात जखडून ठेवणे योग्य नाही.

# भारत हा तरुण लोकसंख्येचा देश!

**युवा हे समाजाचे शक्तिस्थान आहेत आणि त्यांच्या विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी आपण सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे. जागतिक युवा दिन हा त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाची ओळख पटवून देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण संधी आहे. त्यामुळे या दिवसाचे महत्त्व ओळखून त्याचे योग्य प्रकारे पालन करणे आवश्यक आहे. श्रीकृष्णदास निरंकारी उर्फ बापू यांचा सदर मार्गदर्शक लेख अभ्यासुया... संपादक.**



जागतिक युवा दिन दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. हा दिवस तरुणांच्या भूमिका, त्यांचे महत्त्व, आणि त्यांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी साजरा केला जातो. युवा हे समाजाचा भविष्य आहेत आणि त्यांच्यातील सामर्थ्य, जोश, आणि कल्पकता हे समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहेत. जागतिक युवा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. यात कार्यशाळा, चर्चासत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि युवा नेतृत्व विकास कार्यक्रमांचा समावेश असतो. या उपक्रमांद्वारे तरुणांना त्यांचे अधिकार, जबाबदाऱ्या, आणि समाजातील त्यांच्या भूमिकेची जाणीव करून दिली जाते. या दिनानिमित्त तरुणांच्या समस्यांवर चर्चा केली जाते. शिक्षण, रोजगार, मानसिक आरोग्य, आणि सामाजिक न्याय यांसारख्या विषयांवर लक्ष केंद्रित केले जाते. तसेच, तरुणांच्या आवाजाला महत्त्व देऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न केले जातात.

भारतात दरवर्षी १२ जानेवारीला राष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. हा दिवस स्वामी विवेकानंद यांच्या जन्मदिनाला समर्पित आहे. स्वामी विवेकानंद यांचा जन्म दि.१२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला. भारतात राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्याची सुरुवात सन १९८५मध्ये झाली. तेव्हापासून आजपर्यंत दरवर्षी १२ जानेवारी हा दिवस युवा दिन म्हणून साजरा केला जातो. स्वामी विवेकानंद हे केवळ भारतातच नव्हे तर जगभर त्यांच्या विचार आणि आदर्शांसाठी प्रसिद्ध होते. लहान वयातच त्यांनी आपल्या कल्पनांनी जगभरात स्वतःची वेगळी प्रतिमा आणि ओळख निर्माण केली होती. त्यांनी नेहमीच तरुणांना त्यांच्या विचारांनी प्रेरित केले, म्हणूनच त्यांची जयंती युवा दिन म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सन १९८४साली संयुक्त राष्ट्र संघाने ते वर्ष आंतरराष्ट्रीय युवा वर्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर भारत सरकारने यावर विचार केला आणि तेव्हापासूनच दरवर्षी स्वामी विवेकानंदांच्या जयंती १२ जानेवारीला राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला. सन १९८५मध्ये देशात प्रथमच राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला.

महत्त्व आणि उद्देश्य- कोणत्याही देशाचा उत्तम विकास त्या देशातील तरुणांवर अवलंबून असतो. भारत हा तरुण लोकसंख्या असलेला देश आहे आणि देशाची प्रगती तरुणांवर अवलंबून आहे. त्यामुळे देशातील तरुणांना योग्य मार्गदर्शनासाठी हा दिवस साजरा केला जातो. विवेकानंदांच्या जयंतीनिमित्त युवा दिन साजरा करण्यामागचा उद्देश हा आहे की, युवकांनी विवेकानंदांच्या विचारांनी प्रेरित होऊन देशाच्या प्रगतीत हातभार लावावा. देशात राष्ट्रीय युवा दिनाच्या दिवशी सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये थीमसह स्पर्धा आयोजित केल्या जातात. याशिवाय मुले भाषणातून स्वामी विवेकानंदांचे अनमोल विचार सांगतात.आंतरराष्ट्रीय स्तरावर १२ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो. दरवर्षी यानिमित्ताने युवकांशी निगडीत विशिष्ट पैलूवर चर्चा घडवून आणली जाते. यावर्षी शांती स्थापनेत युवकांचा सहभाग- युथ बिल्डींग पीस हे घोषवाक्य निश्चित करण्यात आले आहे. सृजनशील अशा युवा शक्तीच्या माध्यमातून जगभरात शांततेची स्थापना व्हावी हा यामागचा विचार आहे. संयुक्त राष्ट्रांनी १९८५मध्ये पहिले आंतरराष्ट्रीय युवा वर्ष साजरे केले. या घटनेच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त १९९५मध्ये जगातील युवावर्गाच्या स्थितीत अनुकुल बदल घडवून आणण्यासाठी वर्ल्ड प्रोग्राम ऑफ क्शन फॉर युथ स्वीकारण्यात येऊन त्या माध्यमातून मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्र महासभेने शिक्षण, रोजगार, गरिबी, आरोग्य, पर्यावरण, सहभाग, जागतिकीकरण, युवक आणि संघर्ष, एचआयव्ही एड्स आदी १५ क्षेत्रांची निवड प्राध्यान्याने केली. युवकांना मिळणाऱ्या संधींची संख्या वाढविणे, त्यांची गुणवत्ता वाढविणे आणि त्या माध्यमातून समाजासाठी युवकांचे योगदान वाढविणे यादिशेने या कार्यक्रमाद्वारे चांगले प्रयत्न झाले आहेत. लिस्बन येथे ८ ते १२ ऑगस्ट १९९८ दरम्यान पार पडलेल्या युवकांशी निगडीत मंत्र्यांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत १२ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्याची शिफारस करण्यात आली आणि त्यावर १७ डिसेंबर १९९९ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने शिक्कामोर्तब केले. तेव्हापासून हा दिवस युवा दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येतो.

सुरक्षा परिषदेने आपल्या २०१५ आणि २०१६च्या ठरावात शांतीस्थापनेच्या प्रयत्नांना यश येण्यासाठी युवकांची भूमीका महत्त्वाची असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सामाजिक न्याय आणि शांतीस्थापनेच्या अशाच प्रयत्नांना यवर्षीच्या युवा दिनाच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात आले आहे. युवक हा समाजात बदल घडवून आणण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे. युवकांना नागरिकांचे अधिकार, सामाजिक न्याय आणि विश्वशांतीच्या महत्त्वाबाबत जागरूक केले तर जगात विविध पातळ्यांवर असणारे संघर्ष, वाद कमी होऊ शकतील. अशा अनुकुल बदलासाठी युवावर्ग निश्चितपणे पुढे येईल. जनसामान्यांच्या प्रगतीसाठी जागतिक शांततेचे महत्त्व लक्षात घेता शांतता प्रस्थापित करण्यात युवकांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. आजचा युवक ज्ञान आणि विज्ञानाच्या विश्वात वावरणारा आहे. मानवी मुल्ये आणि मानवी विकासाबाबत त्याला चांगली जाण आहे. विज्ञान- तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगातील अनेक समस्यांची उत्तरे शोधण्याची क्षमता त्याच्यात आहे. या क्षमतेचा उपयोग तो जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी निश्चितपणे करू शकतो. जागतिक युवा दिनाच्या निमित्ताने या भूमिकेबाबत चर्चा होणे आणि त्यादिशेने युवकांचा सहभाग वाढणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

!! आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या समस्त युवक मित्रांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

# तिजोरीत खडखडाट योजनांचा मात्र सुकाळ

राज्यावरचे वाढते कर्ज आणि अनेक महत्त्वाच्या गोष्टींसाठी निधीची कमतरता असताना विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सध्या राज्य सरकारमधील मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री घोषणांचा पाऊस पाडत आहेत अगोदरच लाडक्या बहिणीसाठी वेगवेगळ्या खात्यांचा निधी वळविला जात असतानाच आता वीज बिलातील सवलत योजनादूत सारख्या योजना आणि विहार विपश्यना केंद्रांसाठी निधी देण्याची केलेली घोषणा यातील प्रत्यक्षात उतरणार किती?

महाराष्ट्राला विधानसभेचे वेध लागले असून आता राज्य सरकारच्या घोषणांची एक्स्प्रेस सुसाट वेगाने धावत आहे याला कोणत्याच निर्बंधाचा अडथळा नाही सत्तेवर आहोत म्हणून काहीही घोषणा करायला मोकळे आहोत अशाच थाटात सध्या राज्यातील मंत्री विशेषतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार वागत आहेत देवेंद्र फडणवीस त्यातल्या त्यात संयमी वाटत आहेत मात्र एकनाथ शिंदे आणि अजित पवारांनी काय आणि किती घोषणा करायच्या यांचा कसलाच धरबंध ठेवला नसल्याचे चित्र आहे आपल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना अजित पवारांनी शेतकऱ्यांनी वीज बिल भरण्याची आवश्यकता नाही आम्ही सौर वीज योजना आणली आहे त्यामुळे पूर्वीचे बिल देखील भरु नका आणि पुढचे देखील भरु नका असे सांगितले अजित पवार इतक्यावरच थांबले नाहीत तर लाईनमन वीज तोडायला आला तर त्याला सांगा अजित पवारांनी वीज बिल भरु नका असे सांगितलेय असे देखील अजित पवार म्हणाले सत्तेची पिपासा एखाद्या व्यक्तीला किती बदलायला भाग पाडू शकते याचे हे उदाहरण जे अजित पवार आतापर्यंत लोकांना आर्थिक शिस्तीचे धडे द्यायचे तेच आता राज्याला उधळपट्टीच्या मार्गावर धावायला भाग पाडत आहेत शेतकऱ्यांना मोफत वीज द्यायला कोणी विरोध करणार नाही कारण आजकाल कोणाला मोफत नको म्हटले की राग येणारच पण जे काही द्यायचे आहे त्याचे पैसे आणायचे कोठून एकट्या वीज बिलाच्या बाबतीत बोलायचे तर सरकारी तिजोरीवरचा बोजा आताच्या ६ हजार कोटीवरुन १४ हजार कोटी इतका होणार आहे हे झाले अजित पवारांचे मुख्यमंत्र्यांची वेगळीच तऱ्हा सुरू आहे येथे पायाभूत सुविधांना पैसे नाहीत मात्र यांना शासकीय खर्चाने स्वतःच्या सरकारच्या योजनेची प्रसिध्दी करायची आहे बरे त्यासाठी प्रचलित माध्यमांचा वापर देखील करायचा नाहीय तर या माध्यमातून कार्यकर्ते पोसण्याची संधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेना घ्यायची आहे यासाठी म्हणजे राज्यात ५० हजार योजनादूत बनवायचे आहेत प्रत्येक गावात एक आणि शहरी भागात ५ हजार लोकसंख्येच्या वस्तीसाठी एक असे योजनादूत तयार करायचे त्यांच्यासोबत ६ महिन्यांचा करार करायचा त्याना महिना १० हजारांचे मानधन द्यायचे म्हणजे सरकारी खर्चाने औटघटकेचे प्रचारक तयार करायचे अशीच ही योजना यांची अंमलबजावणी करायची ती महिती खात्याने एकतर अगोदरच या खात्याकडे मनुष्यबळाची बोंब त्यात आता ही नवी भरती आणि यातून काम कोणाच्या हाताला मिळणार हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाहीच यासाठी म्हणे ३०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे लोकसभा निवडणूकांमध्ये दलित मतदान भाजप आणि महायुतीपासून दुरावले संविधान बदलाची चर्चा त्यामागचे मोठे कारण होते आता त्या घटकाला देखील सरकारला आकर्षित करायचे आहे त्यासाठीच विहार आणि विपश्यना केंद्रासाठी १ हजार कोटीच्या निधीची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे एकीकडे असे होत असताना दुसरीकडे सामाजिक न्याय विभाग असेल किंवा पर्यटन आणि तीर्थक्षेत्र विकास यांचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळविला जात आहे बांधकाम विभागाचा निधी वळविला जात आहे मग या नव्या घोषणांना निधी आणायचा कोठून? का केवळ आजचे भागवायचे म्हणून काहीही सांगायचे कितीही मंजुऱ्या द्यायच्या ज्यावेळी पैसे देण्याची वेळ येईल तेव्हाचे तेव्हा पाहू अशीच हडेलहप्पी भूमिका तर सरकारची नाही ना असा प्रश्न पडावा असे चित्र आज राज्यात आहे शासनाची योजना जाहीर होते जीआर निघतो लगेच अंमलबजावणीला सुरुवात होते पण निधीची नाटके करायची कशी? राज्याने घेतलेल्या कर्जाचे व्याज भरणे अवघड व्हावे अशी अवस्था तिजोरीची आहे राज्याने अधिकचे कर्ज उभारण्याची मर्यादा देखील ओलांडलेली आहे अर्थात केंद्रात भाजपचे सरकार असल्याने ती वाढविणे फारसे अवघड नाही रिझर्व्ह बँक थोडी खळखळ करेल पण सध्या केंद्रीय सत्तेपुढे कोणाचा विरोध टिकत नाही अशी परिस्थिती आहे त्यामुळे कदाचित अधिकचे कर्ज घेता येईल पण ते फेडण्याचे काय? बरे एकदा निवडणूका झाल्यानंतर या योजनांचे भवितव्य काय योजनादूत सहा महिन्यांसाठीच आहेत कदाचित निवडणूक संपली की त्यांची तीन महिन्यांतच आवश्यकता राहणार नाही लाडक्या बहिणीचे लाड भाऊबीजे नंतर पुरविले जातील का याचे उत्तर मिळणे अवघड आहे मग या साऱ्या योजनांना आणि घोषणांना अर्थ तो काय उरतो

**प्रशांत बाफना /अहमदनगर**
**८०५५४४०३८५**

# औषधांनी रोखा प्री डायबेटिक अवस्था

आपला देश जागतिक पातळीवर मधुमेहाची राजधानी म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. 'इंडिया डायबिटिस' हा वीस वर्षांपेक्षा मोठ्या वयाच्या प्रौढ भारतीयांवर केलेल्या संशोधनाचा अहवाल 'आयसीएमआर'ने गेल्या वर्षी प्रकाशित केला. या अभ्यासानुसार, भारतात १० कोटी, म्हणजे लोकसंख्येच्या ११.४ टक्के मधुमेही आहेत आणि १३.६ कोटी, म्हणजे लोकसंख्येच्या १५.३ टक्के प्री डायबेटिक किंवा मधुमेहपूर्व स्थितीत आहेत. साहजिकच, मधुमेह होण्याची शक्यता असलेल्या व्यक्तींना या दुर्धर विकारापासून कसे दूर राहता येईल, याबाबत व्यक्तिगत आणि सरकारी पातळीवर प्रयत्न व्हायला हवेत.

मधुमेह अजिबात नसणे आणि 'टाइप-२' मधुमेह असणे, यांच्या दरम्यानच्या अवस्थेला मधुमेहपूर्व अवस्था म्हणतात. या अवस्थेचे निदान करण्यासाठी 'ग्लुकोज टॉलरन्स टेस्ट' केली जाते. यामध्ये व्यक्तीची उपाशीपोटीची रक्तशर्करा मोजून, त्याला ७५ ग्रॅम ग्लुकोज ग्लासभर पाण्यातून दिले जाते. त्यानंतर दर अर्ध्या तासाने त्याच्या रक्तशर्करेचे मोजमाप केले जाते. यात मधुमेह नसलेल्या व्यक्तीची शर्करापातळी उपाशीपोटी ८० ते १०० मिलिग्रॅम असते. प्री डायबेटिक व्यक्तीचे हे मोजमाप १२० ते १४५ मिलिग्रॅमच्या दरम्यान असते. ग्लुकोज दिल्यानंतर दर अर्ध्या तासाने केलेल्या मोजणीमध्ये त्याची पातळी १४०-१९५च्या दरम्यान राहत असल्यास त्या व्यक्तीला मधुमेहपूर्व अवस्था आहे, असे मानले जाते. अशा व्यक्तींची 'एचबीए१सी' या चाचणीची पातळी ५.७ ते ६.४ टक्क्यांच्या दरम्यान असल्यास, प्री डायबेटिक अवस्थेच्या निदानाची खात्री होते.

सर्वसाधारणपणे प्री डायबेटिक व्यक्तींपैकी जवळजवळ ५० टक्के पुढील काळात मधुमेही बनतात. काही प्रयत्न करून प्री डायबेटिक अवस्था लांबवता आली, तर मधुमेह खूप उशिरा होतो आणि त्यात गुंतागुंत उद्भवत नाही.

मधुमेह असलेल्या व्यक्तींना हृदयविकार होण्याची आणि स्ट्रोक येण्याची शक्यता मधुमेह नसणाऱ्या व्यक्तींपेक्षा दोन ते चार अधिक असते. मधुमेहाबाबत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, हा एक 'मूक आजार' असतो. सुरुवातीला याची कोणतीही लक्षणे जाणवत नाहीत. रक्ताच्या तपासणीतूनच त्याचे निदान होते. चाळिशीनंतर प्रत्येक व्यक्तीने दर वर्षी रक्तातील साखर आणि 'एचबीए१सी' या चाचण्या करायला हव्यात.

मधुमेह टाळण्यासाठी असलेल्या उपायांमध्ये, जीवनशैलीत परिणामकारक बदल करून, वजन नियंत्रित राखणे गरजेचे असते. त्यासाठी बॉडी मास इंडेक्स (बीएमआय) २० ते २४च्या दरम्यान राखावा लागतो. यासाठी रोज किमान २५ मिनिटे मध्यम प्रतीचा शारीरिक व्यायाम नियमितपणे करणे आणि शर्करायुक्त; तसेच तैलयुक्त स्निग्ध पदार्थ कमी करून, रोजचा आहार १४०० ते १५०० कॅलरींपर्यंत मर्यादित ठेवणे आवश्यक असते. 'चंडीगड अर्बन डायबिटिस स्टडी ग्रुप' यांनी केलेल्या दीर्घकालीन आणि व्यापक संशोधनानुसार, भारतातील व्यक्तींनी वजन योग्य पातळीत राखण्याची काळजी न घेतल्यास, रक्तातील शर्करापातळी सामान्य असूनही, १० वर्षांच्या कालावधीत, १३.६ टक्के लोकांना लोकांना मधुमेह होतो, तर १९.६ टक्के व्यक्ती प्री डायबेटिक बनतात. प्री डायबिटिसची सुरुवात असलेल्यांपैकी ५५.७ टक्के व्यक्ती मधुमेहामध्ये रूपांतरित होतात. प्री डायबिटिसचा धोका वाढवणाऱ्या घटकांमध्ये - ४५ वर्षांपेक्षा अधिक वय, बीएमआय २५ पेक्षा जास्त, बैठ्या जीवनशैलीमुळे शारीरिक निष्क्रियता, मधुमेहाचा कौटुंबिक इतिहास, पोटाचा वाढता घेर, उच्च रक्तदाब, गर्भावस्थेमध्ये मधुमेह होण्याचा इतिहास, कोलेस्टेरॉल आणि ट्रायग्लिसेरॉइड्सची पातळी वाढलेली असणे, यांचा समावेश होतो.

'दा क्विंग प्रिव्हेन्शन स्टडी'नुसार जीवनशैलीतील बदलांमुळे, प्री डायबिटिक व्यक्तीने दोन किलो वजन कमी केल्यास, दृष्टिदोष असलेल्या लोकांमध्ये रेटिनोपॅथीमध्ये ४० टक्के घट होऊ शकते. नेफ्रोपॅथी, न्यूरोपॅथी आणि सूक्ष्म रक्तवाहिन्यासंबंधी गुंतागुंत होण्याचे प्रमाण २८ टक्क्यांनी कमी होते.

जीवनशैलीमध्ये बदल घडवून, त्याचे सातत्याने पालन करणे, हे दैनंदिन जीवनात एक आव्हानच असते. त्यासाठी उच्च पातळीचे मनोबल लागते. साधारणपणे ७० टक्क्यांपेक्षा जास्त व्यक्तींना ते जमत नसल्यामुळे, औषधे वापरण्यावाचून पर्याय नसतो. 'टाइप-२' मधुमेह रोखण्यासाठी किंवा तो पूर्णपणे उद्भवण्यात विलंब करण्यासाठी मेटफॉर्मिन, अल्फा-ग्लुकोसाइडेज इनहिबिटर, इंक्रेटिन रिसेप्टर ॲगनिस्ट (उदा. लिराग्लुटाइड आणि सेमॅग्लुटाइड), थायाझोलिडिनडायोन्स अशी औषधे वापरता येऊ शकतात. यापैकी मेटफॉर्मिन हे बऱ्यापैकी सुरक्षित आणि अत्यंत कमी खर्चात मिळणारे आहे. मधुमेह रोखण्यासाठी, बीएमएआय आणि कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी या औषधाची उपयुक्तता, अनेक क्लिनिकल चाचण्यांमध्ये, विशेषत: तरुण आणि जास्त वजन असलेल्या रुग्णांमध्ये सिद्ध झाली आहे. इंडियन डायबिटिस प्रिव्हेन्शन प्रोग्रॅममध्ये, ग्लुकोज टॉलरन्स चाचणीत दोष आढळलेल्या भारतीय व्यक्तींमधील 'टाइप-२' मधुमेहाची शक्यता कमी करण्यासाठी, जीवनशैलीतील बदलासोबत मेटफॉर्मिन वापरल्यास फायदेशीर परिणाम होतात, असे सिद्ध झाले आहे. या संस्थेच्या संशोधनानुसार, केवळ जीवनशैलीतील बदल केल्यास मधुमेह होण्याची जोखीम २६.५ टक्क्यांनी कमी होते, केवळ मेटफॉर्मिन वापरल्यास ती २६.४ टक्क्यांनी कमी होते; पण जीवनशैलीतील बदल आणि मेटफॉर्मिन एकत्रित केल्यास मधुमेह होण्याची जोखीम २८.२ टक्क्यांनी कमी होते.मधुमेहाच्या उपचारामध्ये 'अमेरिकन डायबिटिस असोसिएशन'तर्फे दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे जगभरात पालन केले जाते. या संस्थेने जाहीर केल्यानुसार, 'टाइप-२' मधुमेहाची उच्च जोखीम असलेल्या २५ ते ५९ वयाच्या प्रौढांमध्ये, बीएमआय ३५पेक्षा जास्त असेल, उपाशी पोटीची शर्करा ११० मिलिग्रॅमपेक्षा अधिक असेल, 'एचबीए१सी' सहा टक्क्यांपेक्षा अधिक असेल आणि स्त्रियांना गरोदर अवस्थेतल्या 'जेस्टेशनल डायबिटिसचा इतिहास असेल, तर त्यांना मेटफॉर्मिन द्याव

# २१ व्या पशुगणनेस कंधार तालुक्यात सुरुवात;पशुपालकांनी सहकार्य करावे

## प्रगनक येता दारी! पशुगणनेची माहिती देऊन शासनास सहकार्य करू सर्वोत्परी

**नांदेड । प्रतिनिधी**

पशुपालन ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये याचे लक्षणीय योगदान आहे. शासनाला नियोजनासाठी पायाभूत सांख्यिकी माहितीची अत्यंत आवश्यकता असते. अशी पायाभूत माहिती गणनेच्या स्वरूपात गोळा केली जाते. देशात सण १९१९-२० पासून पशुगणनेस सुरुवात झाली आहे. तेव्हापासून दर पाच वर्षांनी पशुगणना घेण्यात येते. यावर्षी होणारी २१ वी पशुगणना ही शंभर टक्के केंद्र पुरस्कृत योजना असून राज्यामध्ये दि. २५ नोव्हेंबर २०२४ ते दि. २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत होणार आहे.

पशुगणना करण्याचा उद्देश असा आहे की विविध पशुधन प्रजातींचे जात, वय आणि लिंग व उपयोगानुसार अचूक माहिती गोळा करणे. तसेच भटकी कुत्री भटक्या गाई आणि प्रथमच भटका पशुपालक समुदाय (पॅस्टोरल कम्युनिटी), गोशाळा पांजारपोळातील गोवंशाची अचूक माहिती गोळा करणे. पशुगणना केल्याने राज्यातील दूध, अंडी, मांस आणि लोकर उत्पादन यांचा अंदाज करता येतो. पशुधनाचा लसीकरणाचा कार्यक्रम राबविता येतो. विविध योजना राबविण्यास मदत होते. विविध प्रकारच्या पशुधनाचा शोध घेण्यास मदत होते. पशुपैदास गायी व म्हशींची संख्या ठरवणे, पशुवैद्यकीय दवाखान्याची संख्या ठरवणे, पशुधन कुक्कुट आदी पक्षी यांचा वृद्धीदर ठरवणे, पशुधन क्षेत्रातील उदयोन्मुख ट्रेंड नमुने आणि आव्हाने ओळखणे यासाठी पशुगणना करणे आवश्यक आहे. विविध प्रदेश आणि समुदायांना त्यांच्या पशुधन लोकसंख्येवर आणि गरजांवर आधारित निधी पायाभूत सुविधा आणि सेवा यासारख्या संशोधनाची वाटप करण्यात पशुगणना मदत करते. राज्यात होणारी२१वी पशुगणना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत मोबाईल पच्या माध्यमातून केली जाणार आहे. पशुगणनेच्या माध्यमातून राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील कुटुंब, कौटुंबिक उपक्रम, बिगर कौटुंबिक उपक्रम आणि संस्था गोशाळा यांच्याकडे असलेल्या आणि राज्यात आढळणाऱ्या पशुधनाच्या १६ प्रजाती (गाय वर्गीय, म्हैसवर्गीय पशुंसह, मिथुन, मेंढी, शेळी, डुक्कर, घोडा, शिंगरू, खेचर, गाढव, उंट, कुत्रा, ससा, हत्ती) व कुक्कुट पक्षी (कोंबडे-कोंबड्या, बदक, टर्की आणि ईमू, क्वेल, गिनी, शहामृग) यांची जातीनिहाय, वयोगट तसेच लिंगनिहाय व उपयोगानुसार आकडेवारी गोळा केली जाणार आहे. भटकी कुत्री, भटक्या गाई आणि प्रथमच भटका पशुपालक समुदाय (पॅस्टोरल कम्युनिटी) गोशाळा पांजरपोळातील गोवंशाची देखील माहिती संकलित करण्यात येणार आहे. करिता या पशुधनाच्या उत्सवात तालुक्यातील सर्व पशुपालकांनी व शेतकऱ्यांनी सहभागी होऊन आपल्याकडे येणाऱ्या प्रगनकांकडे आपल्या पशुधनाची संपूर्ण माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करणवाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी एस. जी. माळोदे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. दिनेश महेर, कंधार तालुक्याचे तहसीलदार रामेश्वर गोरे, गटविकास अधिकारी महेश पाटील, पशुधन विकास अधिकारी (वि.) डॉ. शशिकांत भालके यांच्या मार्गदर्शनाखाली पशुधन विकास अधिकारी, फुलवळ डॉ. दिनेश रामपुरे यांनी केले आहे.



## क्रिकेट सामन्याचे उद्योजक प्रवीण ठाकूर यांच्या हस्ते उदघाटन



**उरण । विठ्ठल ममताबादे**

स्वप्निल स्पोर्टस कंठवळी मर्यादित क्रिकेट सामन्याचे उद्घाटन प्रसिद्ध उद्योजक प्रविण ठाकुर ( बिल्डिंग कंस्ट्रक्शन,कोपर)यांच्या हस्ते झाले.यावेळी दर्शन ठाकुर (उद्योगपती),गोपीनाथ पाटील (गाव अध्यक्ष), माधव पाटील, वसंत पाटील,दिपक पाटील, विशाल पाटील,वैभव पाटील, साईनाथ पाटील, माजी जिल्हा जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.लहान बालके व तरुणांचा आवडता खेळ म्हणजे क्रिकेट. या खेळाला तसेच खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने शिवसेना शिंदे गटाचे पनवेल तालुका उपाध्यक्ष तथा उद्योगपती प्रवीण ठाकूर हे प्रयत्नशील असून त्यांनी या क्रिकेट सामन्याचे मोठया उत्साहात उदघाटन केले आहे.

## डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कृषी महाविद्यालय, विळदघाट येथे रक्तदान शिबिर संपन्न

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी महाविद्यालय, विळदघाट येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेचे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. 'रक्तदान करून अनेकांना जीवदान देऊ या' हा संकल्प सर्वांनी करूया असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे यांनी करून 'रक्तदान हेच जीवनदान' असे प्रतिपादन केले. सदरील शिबिर डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कृषी महाविद्यालय आणि डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाले.



याप्रसंगी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन विळदघाटचे उपसंचालक (तांत्रिक) प्रा. डॉ. सुनिल कल्हापुरे, डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलच्या डॉ. चैत्राली बट्टाड, डॉ. ओंकार, डॉ. संकेत, गौतम सगलगिले, संदीप आयनार, रक्तपेढीचे तांत्रिक अधिकारी रुचिका गुळावे, श्रेयस ढेपे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे, उपप्राचार्य डॉ. एस. बी. राऊत, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. किरण दांगडे यांच्यासह सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.यावेळी बोलताना महाविद्यालयाचे डॉ. मधुकर धोंडे यांनी सांगितले की, दरवर्षी राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत विविध उपक्रम राबवले जातात. त्यापैकी रक्तदान शिबिर हा अतिशय स्तुत्य उपक्रम देखील राबवला जातो. रक्तदान शिबिरातून स्वेच्छेने केलेले रक्तदान कोणालातरी उपयोगी पडते व त्यामुळे कोणाचे तरी प्राण वाचू शकतात. या रक्तदान शिबिराच्या माध्यमातून ३५ बॅग रक्त संकलन करता आले, याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन धन्यवाद दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वयंसेवक कोमल जगताप व आभार निकिता शिंदे यांनी मानले.

## विवेकानंद महाविद्यालयात चंद्रपुर जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धा संपन्न

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात चंद्रपुर जिल्हा अजिंक्यपद वरिष्ठ गट पुरुष व महिला स्पर्धा व निवड चाचणी सामने द्रोणाचार्य क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, भद्रावती तसेच विवेकानंद महाविद्यालय, भद्रावती यांच्या संयुक्त विद्यमानाने घेण्यात आल्या.



या स्पर्धेत चंद्रपूर जिल्ह्यातील एकुण ७ खो-खो क्रीडा मंडळानी सहभाग घेतला होता. द्रोणाचार्य क्रीडा व सांस्कृतिक मंडळ भद्रावती, नव क्रांतिज्योत क्रीडा मंडळ, चंद्रपुर , तालुका क्रीडा संकुल, वरोरा, संभाजी क्रीडा मंडळ, वरोरा, आनंदवन स्पोर्ट्स हब, वरोरा, युवा क्रीडा मंडळ, चंद्रपुर, ज्ञान ज्योती क्रीडा मंडळ, नवरगाव निवड चाचणीच्या अंतिम सामन्यात द्रोणाचार्य क्रीडा व सांस्कृतिक मंडळ भद्रावती पुरुष संघाने नव क्रांतिज्योत क्रीडा मंडळ चंद्रपुर या पुरुष संघावर २०-१८ असा २ गुणांनी विजयी झाला. तर महिलांच्या अंतिम सामन्यात नव क्रांतिज्योत क्रीडा मंडळ चंद्रपुर या संघाने तालुका क्रीडा संकुल वरोरा या संघावर ११-८ असा ३ गुणांनी विजयी झाला. संपन्न झालेल्या निवड चाचणी स्पर्धेतुन चंद्रपुर जिल्हा पुरुष व महिला या दोन्ही संघाची राज्यस्तरीय खो खो स्पर्धेकरिता निवड करण्यात आली. स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे चंद्रपुर जिल्हा खो-खो असोसिएशन चे सचिव अशोक मोरे , प्रा. संगिता बांबोडे, प्रा. डॉ. यशवंत घुमे, दिनेश कोयचाडे , अनिल नरुले , दिपक ठाकरे, दलित बदखल , योगेश मेनेवार, संतोष निंबाळकर , युवराज भारती विनोद कावटे , भुषण बावणे, दिपक कावटे , योगिता शिंदे, सुचिता ढेंगळे, माधुरी अवघडे इ. मान्यवर उपस्थित होते.

## डॉ.सुजय विखे यांनी पारनेर येथे कार्यकर्त्यांशी साधला संवाद

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर :अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर येथे मी कधीच काही बोलत नाही. मात्र न बोलतासुद्धा सर्व काही करत असतो. माझे काम येथील कार्यकर्त्यांना संरक्षण देण्याचे व त्यांच्या भावना उच्चस्तरीय पातळीवर पोहचविण्याचे आहे. मी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करतो.हे काम करता आले, तरच ती व्यक्ती नेता होऊ शकते, असे प्रतिपादन माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दैनिक सह्याद्रीचा राखणदारच्या पत्रकारांशी बोलताना केले.



डॉ. विखे पाटील शनिवारी दुपारी पारनेरच्या दौऱ्यावर आले होते. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले की, आमचे कार्यकर्ते लोकसभेला व विधानसभा निवडणुकीत पक्षासाठी भरपूर पळाले. त्यांच्या भावनांचा आदर केला पाहिजे, त्यांचे मत काय आहे ,ते वरिष्ठ पातळीवर पोचविण्याची माझी जबाबदारी आहे, यातच सर्व काही आले. डॉ. विखे यांचे सुपे येथे भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, पारनेर तालुका दूध संघाचे अध्यक्ष दत्तानाना पवार, मुख्यमंत्री लाडकी माझी बहीण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात, जिल्हा युवा सरचिटणीस सागर मैड, मनोज मुंगशे, सुनील पवार, मधुकर पठारे, अमोल मैड, राहुल पवार, संग्राम पवार, गंगाराम पवार आदींसह कार्यकर्त्यांनी जोरदार स्वागत केले. त्यांनी तालुक्यात म्हसणे फाटा, नारायणगव्हाण, पारनेर अशा विविध ठिकाणी कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या. त्यांचे सर्वत्र उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. वडनेर हवेलीचे सरपंच लहू भालेकर यांच्या वडिलांचे नुकतेच निधन झालेअसल्याने त्यांच्या घरी जाऊन डॉ. विखे यांनी त्यांचे सांत्वन केले.

## लोकनेते जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त एस.के.एच महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव लोकनेते मा.जयदत्तजी (अण्णा) क्षीरसागर साहेब यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त सोनाजीराव क्षिरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय द्वारा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.७ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन लोकनेते जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांचे स्वीय सहाय्यक गिरीष देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय मेडिकल महाविद्यालयाचे सल्लागार तथा काकू- नाना प्रतिष्ठानचे सचिव डॉ.अरुण भस्मे,मा.नगरसेवक सुनील पांगारकर,सुभाष क्षीरसागर,प्रकाश राठोड स्वीय सहाय्यक परमेश्वर धारकर,श्रीराम कुरे, जयश्री विधाते, उपप्रचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर, विलास विधाते यांची प्रमुख उपस्थिती होती.




मा.प्राचार्य तथा काकू नाना प्रतिष्ठानचे सचिव डॉ. अरुण भस्मे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, मानवी जीवनात रक्तदानाचे अनन्य साधारण महत्त्व असून माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने प्रचंड यश संपादन केलेले असले,तरीही अद्याप कृत्रिम रक्त तयार करण्यास यश आलेले नाही त्यामुळे मानवी रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की,रक्तदानानंतर काही तासांतच शरीरास आवश्यक रक्त निर्मिती होऊन योग्य रक्त पातळी तयार होते.शहरातील विविध रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा मोठा तुटवडा असून रुग्णाबरोबरच त्यांच्या नातेवाईकांना देखील गंभीर समस्येला तोंड द्यावे लागते.सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय दरवर्षीप्रमाणे यावर्षीही लोकनेते जयदत्त (अण्णा)क्षीरसागर साहेब यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर आयोजित करून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे कार्य सातत्याने करत आले आहे. यावेळी एच एम एम विभागाचे प्रा. डॉ.शेख नासेर,डॉ.वैभव शहापुरे,डॉ.अशोक शिंदे, ग्रंथपाल डॉ.गणेश खेमाडे,सहाय्यक ग्रंथपाल सौ.उषा राऊत, राणी रणखांबे यांचे सह महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर रक्तदान केले. रक्तदान शिबिर जिल्हा रुग्णालय रक्तपेढीचे दादा कुंबकर,गौतम मैरठ,आर एस.खेडकर, नितीन सोळंके, मुन्ना नागरगोजे बालाजी घुले,अक्षय घुले,मयुरेश गायकवाड यांनी रक्त संकलन केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा.राजा मचाले,डॉ.विवेक दुसाने,उमेश वाघमारे, ज्योतिबा काळे,दत्ता आघाव, बिराजदार यांनी परिश्रम घेतले. यावेळी फार्मसी विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. अंजली पवार, डॉ.मीना हंगे डॉ.सोनल बाहेती,डॉ. मीना भस्मे डॉ.अंजली क्षीरसागर डॉ.बजाज मॅडम, डॉ.रत्ना क्षीरसागर,डॉ.सुरेश तोष्णीवाल,डॉ.शेख जफ्फर, डॉ.ज्ञानेश्वर जोशी, डॉ.राजेश कुलकर्णी आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बांगलादेशातील अल्पसंख्यांक हिंदूंच्या मानवाधिकार, मालमत्ता आणि जिविताचे संरक्षण करण्याची प्रधानमंत्री मोदींकडे निवेदनाद्वारे मागणी

**लोहा (वा.) । किरण दाढेल**

मागील काही कालावधी पासून महिन्यांपासून बांगलादेशात अल्पसंख्यांक असलेल्या हिंदूच्या मानवधिकार, मालमत्ता आणि जिवितांचे हनन झाल्याचे प्रसारमाध्यमांतून निदर्शनास येते. तसेच बांगलादेशात मागील काही महिन्यांमध्ये हिंदू मंदिरावरील हल्ले, तोडफोड, हिंदू धर्मियातील आबालवृद्ध आणि महिलांवर झालेले अमानवीय अत्याचार आणि त्यात सातत्याने होत असलेली वाढ हि गंभीर बाब असून मानवाधिकारांचे हनन करणा-या वृत्तींना रोखण्यासाठी तत्काळ कार्यवाही करावी अशी मागणी सकल हिंदू समाजाच्या वतीने निवेदनाद्वारे देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना केली आहे.

पुढे निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, शेजारील बांगला देशात केलेल्या अल्पसंख्यांक हिंदू समाजावरील असहिष्णू आणि अमानवीय अत्याचारामुळे बांगलादेशातील हिंदू समूदाय हा प्रचंड त्रस्त आणि व्यथित झाला आहे. त्यामुळे तेथील हिंदू धार्मिक स्वातंत्र्य धोक्यात आले आहे. सदरील प्रकाराकडे बांगलादेश शासनाने त्याकडे जीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. तेथील हिंदू समाजाचे चिन्यय कृष्ण महाराज यांना खोट्या गुन्हयात जबरदस्तीने अडकवून हिंसात्मक पध्दतीने केलेली अटक ही निंदनीय आणि अशोभनीय आहे. तसेच चिन्मय कृष्ण महाराजांना चित्तागोग मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले तीथे त्यांना योग्य तो



औषधोपचार आणि भोजन मिळण्यास जाणीवपूर्वक अडचणी निर्माण करण्यात येत आहेत. सदर प्रकार जागतिक स्तरावर मान्य अशा मानवाधिकारांचे उल्लंघन करणा-या आहेत. याच कारागृहात विविध कट्टरतावादी मुस्लिम दहशतवादी संघटनेशी संबंधित गुन्हेगार आहेत. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सदरील घटनेची गांभीर्यपूर्वक विचार करून तेथील हिंदूंना संरक्षण द्यावे अशा मागणीचे निवेदन लोह्याचे तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या मार्फत देण्यात आले. यावेळी लोहा तालुक्यातील सकल हिंदू समाज बांधवांची बहुसंख्येने उपस्थितीती होती. निवेदनावर सकल हिंदू समाजाचे युवराज पाटील शिंदे, आनंद कदम, हरिश देशमुख, रामभाऊ मोरे, दत्ता बोरलेपवार, विनायक कोपनर, रोहित देशमुख, भारत कल्याणकर, योगी महाराज, शिवाजी महाराज, खंडू पळसे, बालाजी संगेवार, कृष्णा बंकवाड, ज्ञानेश्वर भालेराव, मोहन गहेरवार, हरीपंत कनकदंडे, मारोती तेलंगे, नारायण इबितवार आदींसह बहुसंख्यांक समाज बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षणासाठी बुधवारी परिचय कार्यशाळेचे आयोजन

**जालना । असलम कुरेशी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (अनुसुचित जाती/जमाती) उद्योजकांसाठी विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत मोफत १८ दिवसीय निवासी उद्योजकता विकास कार्यक्रमांचे सविस्तर माहिती मिळण्याच्या दृष्टीने बुधवार दि. ११ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जालना येथे मोफत उद्योजकता परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी इच्छुकांनी उपस्थित राहून कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्र व्यवस्थापक योगेश सारणीकर यांनी केले आहे.

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राकडून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर



(अनुसुचित जाती/जमाती) उद्योजकांसाठी विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत मोफत १८ दिवसीय निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये उद्योजकीय प्रेरणा, उद्योजकीय गुणसंपदा, विविध संधी मार्गदर्शन, उद्योगाची निवड, उद्योगाचे व्यवस्थापन, उद्योगाला आवश्यक विविध परवाने, शासकीय व निमशासकीय विविध कर्ज योजना, खेळत्या भांडवलाचे व्यवस्थापन, प्रकल्प अहवाल तयार करणे बँकेची कर्ज प्रक्रिया, आदिबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. तसेच प्रशिक्षण पश्चात उद्योग सुरू करण्यासाठी हॅन्ड होल्डिंग सपोर्ट महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रामार्फत केला जाईल.

सदरील प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी प्रशिक्षणार्थी हा फक्त अनुसूचित जाती प्रवर्गातील असणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थीकडे जातीचे प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, आधार कार्डची छायांकित प्रत असणे गरजेचे असून उमेदवार हा १८ ते ४० या वयोगटातील असणे आवश्यक आहे. असे एमसीईडी विभागीय अधिकारी सुदाम थोटे व प्रकल्प अधिकारी विनोद तुपे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# हंगामी वसतिगृहातील १९ विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा अंबाजोगाई तालुक्यातील घटना

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई - तालुक्यातील येलडा येथील ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी असलेल्या हंगामी वसतिगृहातील १९विद्यार्थ्यांना जेवणातून विषबाधा झाल्याची घटना समोर आली आहे. सध्या सर्व विद्यार्थ्यांवर अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयात उपचार सुरू असून सर्वांची प्रकृती धोक्याबाहेर आहे

येलडा येथे ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी हंगामी वसतिगृह आहे यावर्षी काही दिवसांपूर्वीच हे वसतिगृह सुरू झाले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री वसतिगृहातीलविद्यार्थ्यांना नेहमीप्रमाणे जेवण देण्यात आले. यात वांग्याची भाजी, भात, भाकरी असे पदार्थ होते. रात्ती १२ वाजताच्या नंतर यापैकी




काही विद्यार्थ्यांना उलट्या आणि जुलाबाचा त्रास होऊ लागला. वसतिगृह कर्मचाऱ्यांनी तातडीने त्यांना स्वाराती रुग्णालयात दाखल केले. सध्या एकूण १९ विद्यार्थ्यांवर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली.

# प्रबोधनकार ठाकरे विद्यालयातील संजय शिंदे यांना जिल्हास्तरीय पुरस्काराने सन्मानित



**सोलापूर । विश्वास चोपडे**

माढा तालुक्यातील उंदरगावचे रहिवासी श्री संजय श्रीरंग शिंदे हे सत्यशोधक बहुविध समाजसेवी संस्था कुर्डूवाडी संचलित प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे तालुका माढा या संस्थेमध्ये २१ वर्षापासून कार्यरत आहेत यांना महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या वतीने दिल्या जाणाऱ्या सन २०२४-२०२५ च्या जिल्हास्तरीय कृतिशील शिक्षकेतर कर्मचारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

निवडीचे पत्र पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी दिले. या पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र शाल भेट श्रीफळ व पुष्पगुच्छ असे होते पुरस्कार वितरण रविवार दिनांक ८ डिसेंबर २०२४ रोजी पंढरपूर तालुक्यातील कुर्टी येथील सिंहगड कॉलेजमध्ये करण्यात आले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरावर कौतुक व अभिनंदन होत आहे.

# शिर्डी येथे रविवारी महा-ई-सेवा केंद्र संचालकांचे अधिवेशन

**बीड । प्रतिनिधी**

महा-ई-सेवा केंद्र संचालकांचे पहिले अधिवेशन शिर्डी येथे रविवार दिनांक ०८ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेले आहे अशी माहिती शिरूर कासार येथील महा- ई- सेवा केंद्र संचालक अशोक विघ्ने यांनी दिली आहे तसेच सर्व केंद्र संचालक यांना अधिवेशनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. या राज्यस्तरीय अधिवेशनात महा-ई-सेवा केंद्र संचालक यांच्या अडचणी काम करताना येणाऱ्या समस्या या बाबत चर्चा करून नवीन संघटना बांधणी बाबत विचार विनिमय होणार आहे. बीड जिल्ह्यातील सर्व महा-ई-सेवा केंद्र संचालक यांनी अधिवेशनात



सहभागी व्हावे असे आवाहन राज्य कार्यकारणी सदस्य तथा जिल्हाध्यक्ष प्रवीण मुंडे यांनी केले आहे. राज्य शासनाने महसूल संबंधित विविध प्रकारच्या सुविधा जनतेला मिळाव्यात यासाठी आधार कार्ड व सेतू सुविधा केंद्र सुरु केले आहेत. मात्र आधार कार्ड केंद्र आणि सेतू सुविधा केंद्र संचालक यांच्या अनेक अडचणी आहेत . त्या विषयी चर्चा करून सरकारकडे मागण्याचे निवेदन सादर करावयाचे आहे. म्हणून या अधिवेशनाला बीड जिल्ह्यातील सर्व महा-ई-सेवा केंद्र संचालक यांनी या अधिवेशनात सहभागी व्हावे. असे आव्हान केंद्र संचालक अशोक विघ्ने यांनी केले आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्व महा ई सेवा केंद्र संचालक यांनी उपस्थित राहावे.

# राष्ट्र प्रेमाची भावना मनात ठेवून ध्वजदिन निधी संकलनात अमुल्य योगदान द्यावे-जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ

## सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ

**जालना । असलम कुरेशी**

भारत देशाच्या संरक्षणासाठी आपले वीर सैनिक देशाच्या सिमेवर कोणत्याही वातावरणात आपली सेवा निष्ठेने बजावत असतात. सैनिक अत्यंत कठीण वातावरणासह परिस्थितीला सामोरे जावून देशाच्या सिमेचे दिवसरात्र संरक्षण करत असतात. तरी सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अधिकाऱ्यांसह नागरिकांनी राष्ट्र प्रेमाची भावना मनात ठेवून ध्वजदिन निधी संकलनात आपले अमुल्य योगदान द्यावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.

सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ जालना येथील सैनिकी लॉन्सवर पार पडला. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी महापालिका उपायुक्त नंदा गायकवाड, सेवानिवृत्त स्कॉड्रन लिडर तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ.रुपाली सरोदे, जिल्हा उद्योग केंद्र व्यवस्थापक योगेश सारणीकर, शिक्षणाधिकारी मंगल धुपे यांची प्रमुख उपस्थिती होती.




जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले की, आपले सैनिक सिमेवर खडा पहारा देत असल्याने आपण देशांतर्गत निर्भय जीवन जगत असतो. लोकशाहीचे मुल्य अबाधित ठेवण्यास तसेच देशाच्या प्रगतीत सैनिकांचा मोलाचा वाटा आहे. जो देश आर्मी व मिल्ट्रीचा चुकीचा अवलंब करतो तो देश कधीही प्रगती करु शकत नाही. नवीन पिढीला सैनिकांच्या भावना समजण्यासाठी शाळेतील विविध कार्यक्रमात एखादा भाग सैनिकांवर आधारित ठेवण्यात यावा. नागरिकांनी सार्वजनिक जीवनात सैनिक, माजी सैनिकांसह वीर माता, वीर पिता, वीर पत्नी यांचा नेहमी आदर करावा. असे सांगुन सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचे गेल्या वर्षी दिले गेलेले उद्दीष्ट सर्व कार्यालय प्रमुखांनी पुर्ण केले त्याबद्दल अभिनंदन करत चालु वर्षाची उद्दीष्टपूर्ती करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. सशस्त्र सेना ध्वजदिन निधीचा सैनिकांच्या कल्याणकारी योजनांसाठी वापरण्यात येत असतो. जालना जिल्ह्याला सशस्त्र सेना ध्वजदिन निधीचे दिले गेलेले उद्दीष्ट २२१ टक्के पुर्ण केले आहे. सर्वांनी सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास मदत करावी. असे सांगून सशस्त्र सेना ध्वजदिन निधीचे महत्व प्रास्ताविकातुन सेवानिवृत्त स्कॉड्रन लिडर तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ. रुपाली सरोदे यांनी समजावुन सांगितले.कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने व शहिदांना आदरांजली अर्पण करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गोविंद इंगोले यांनी करुन आभार मानले. पार्थ सैनिकी शाळेतील विद्यार्थ्यांनी हम सब भारतीय है..! हे संगीतबध्द गीत सादर केले. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या माजी सैनिकांच्या पाल्यांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच मागील वर्षी उत्कृष्ट निधी संकलन केलेल्या कार्यालय प्रमुखांचा गौरवही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमास माजी सैनिकांसह वीर माता, वीर पिता, वीर पत्नी, एनसीसी, पार्थ सैनिकी शाळेतील विद्यार्थी, नागरिक, विविध कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077